# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.07.2026** **वारःरविवार**

---

- **संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या 20 जुलैपासून सुरू होणार**
- **पंतप्रधानांच्या हस्ते देशातल्या तिसऱ्या मोठ्या सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्पाचं गुजरातच्या सानंद इथं काल उद्घाटन**
- **इथेनॉल धोरणात आवश्यक ते बदल करणार, केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांची ग्वाही; तर इथेनॉल मिश्रित इंधनामुळे वाहनांच्या इंजिन कार्यक्षमतेवर अत्यल्प परिणाम होत असल्याचा विविध तज्ज्ञ संस्थांचा निर्वाळा**
- **पूर्व अमेरिकेत तीव्र उष्णतेची लाट; आतापर्यंतच्या सर्वाधिक तापमानाची नोंद होण्याची शक्यता**
- **देशातल्या विविध भागात जोरदार पावसाचा इशारा, महाराष्ट्रात पावसामुळं जनजीवन विस्कळीत आणि**
- **फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत मोरोक्कोचा कॅनडावर विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश**

**संसदअधिवेशन**

संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या 20 जुलैपासून सुरू होणार असून हे अधिवेशन 13 ऑगस्टपर्यंत चालणार आहे. 20 जुलैपासून संसदेचं पावसाळी अधिवेशन बोलावण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली असल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी काल दिली. या अधिवेशनात महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर अर्थपूर्ण चर्चा, विचारविनिमय आणि निर्णय घेण्यावर भर दिला जाईल,असंही रिजिजू यांनी सांगितलं.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल गुजरातच्या सानंद इथं 'सीजी सेमी'च्या अत्याधुनिक 'आउटसोर्स्ड सेमीकंडक्टर असेंब्ली अँड टेस्ट' प्रकल्पाचं उद्घाटन केलं. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासह जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज उपस्थित होते. 7 हजार 500 कोटीहून अधिक रुपयांच्या प्रचंड गुंतवणुकीतून उभारलेला हा प्रकल्प भारताचा तिसरा मोठा सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्प ठरला असून, देशाच्या आत्मनिर्भरतेच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

**पंतप्रधान-राजस्थान**

राजस्थानमधील पायाभूत सुविधा, ऊर्जा, परिवहन आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल 1 लाख 5 हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विकासकामांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली तसंच जोधपूर विमानतळावरील नवीन टर्मिनल इमारतीचे उद्घाटनही काल त्यांच्या हस्ते झालं. त्यानंतर, बालोतरा जिल्ह्यातील पचपदरा इथं त्यांनी देशातील अत्याधुनिक 'ग्रीनफील्ड रिफायनरी-कम-पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्स' देशाला समर्पित केलं.

**पंतप्रधान-दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्राबोवो सुबियांतो यांच्या निमंत्रणावरून, ते या दौऱ्यावर जात आहेत. मोदींची इंडोनेशियाला भेट

देण्याची ही चौथी वेळ आहे, तसंच मे 2018 मध्ये भारत-इंडोनेशिया 'सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी'चा दर्जा मिळाल्यानंतरची ही पहिलीच द्विपक्षीय चर्चा असेल.

**परराष्ट्रमंत्रीदौरा**

परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आजपासून 10 जुलैपर्यंत कतार, बहरीन, कुवेत आणि ओमानच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात भारताचे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यावर भर दिला जाईल, तसंच प्रादेशिक घडामोडी आणि परस्पर हिताच्या मुद्द्यांवर विचार-विनिमय करण्यात येईल. ओमानच्या दौऱ्यानंतर, डॉ. जयशंकर 13 जुलैला न्यूयॉर्कमध्ये आयोजित संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या 2028-29 या कालावधीसाठी भारताच्या अधिकृत मोहिमेचा शुभारंभ करतील. त्यानंतर 14 आणि 15 जुलैला ते ब्रुसेल्सला आयोजित भारत-युरोपियन युनियन व्यापार आणि तंत्रज्ञान परिषदेच्या तिसऱ्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

**इथेनॉल**

गेल्या शतकभरापासून इथेनॉलचा इंधन म्हणून वापर केला जात आहे, असं सांगत सध्या प्रश्न उपस्थित होत असलेल्या बायोफ्युएल ब्लेंडिगबाबत प्राप्त सूचनांचा इथेनॉल धोरणांसदर्भातल्या अंमलबजावणीत समावेश केला जाईल आणि आवश्यक ते बदल केले जातील, अशी ग्वाही केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी दिली आहे. ते काल राजस्थानमधील एका कार्यक्रमात बोलत होते.

**E20**

दरम्यान, ई ट्वेंटी (E20) इथेनॉल मिश्रित इंधनामुळे वाहनांच्या इंजिनाच्या कार्यक्षमतेवर अत्यल्प परिणाम होत असल्याचा निर्वाळा विविध तज्ञ संस्थांनी काल देशभरात घेतलेल्या पत्रकार परिषदांच्या माध्यमातून केला. 40 ते 60 हजार किलोमीटरच्या कठोर चाचण्यांमधून या इंधनाची विश्वासार्हता सिद्ध झाल्याची माहिती ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया अर्थात एआरएआयनं काल पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. ई ट्वेंटी (E20) इंधनाशी सुसंगत वाहनं बाजारात आणण्यापूर्वी त्यांची प्रत्यक्ष रस्त्यावर आणि प्रयोगशाळेत कठोर चाचणी केली जाते. या चाचण्यांमध्ये इंजिनाची कार्यक्षमता, टिकाऊपणा आणि सुरक्षितता तपासली जाते. या चाचण्यांनंतर इंजिनाच्या कार्यक्षमतेवर अत्यल्प परिणाम होत असून वाहन दीर्घकाळ कार्यक्षम राहतं, असं एआरएआय चे संचालक डॉ.रेजी मथाई यांनी सांगितलं.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**अमेरिका-उष्णतालाट**

पूर्व अमेरिकेत तीव्र उष्णतेची लाट पसरली असून, त्यामुळं वीज वितरण प्रणालीवर मोठा ताण येत आहे,ज्यामुळं फिफा विश्वचषक सामन्यांच्या तयारीमध्येसुद्धा व्यत्यय येत आहे. न्यूयॉर्क शहर प्रशासनानं या तीव्र उष्णतेचा सामना करण्यासाठी अनेक उपाययोजना सुरू केल्या आहेत. अमेरिकेच्या राष्ट्रीय हवामान विभागानं आतापर्यंतच्या सर्वाधिक तापमानाची नोंद होण्याची शक्यता वर्तवली आहे.

**पदक**

जागतिक शांतता राखण्याच्या मोहिमेतील भारताच्या दीर्घकालीन योगदानाबद्दल संयुक्त राष्ट्रांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या भारतीय लष्कराच्या 651 जवानांना प्रतिष्ठित 'युनायटेड नेशन्स मेडल' प्रदान करण्यात आली .

**कांदा**

केंद्र सरकारनं कांदा खरेदी दरात 13 टक्क्यांची वाढ केली आहे. हा दर प्रति क्विंटल 1 हजार 875 रुपयांवरून 2 हजार 125 रुपये करण्यात आला आहे. सुधारित दर काल पासून लागू झाले आहेत. सध्या नाफेड आणि एनसीसीएफ या संस्थांमार्फत सरकारी राखीव साठ्यासाठी कांदा खरेदीची प्रक्रिया वेगानं सुरू आहे.

**प्रधानमंत्री-पीक-विमा**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि इतर प्रतिकूल परिस्थितीमुळं होणाऱ्या उत्पादनातील नुकसानापासून आर्थिक संरक्षण मिळावं, या उद्देशानं राज्य शासनानं 2026-27 आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. तेंव्हा शेतकऱ्यांनी 31 जुलैपूर्वी नोंदणी करावी असं आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं आहे.

**यात्रा**

'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेवर आधारित 'सोमनाथ स्वाभिमान यात्रेतले जम्मू-काश्मीरमधले यात्रेकरू जम्मूतावी रेल्वे स्थानकावर परतले, ही यात्रा आध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध करणारा अनुभव असल्याचं मत यात्रेकरूनी व्यक्त केलं. तसंच त्यांनी गुजरात सरकार आणि तिथल्या जनतेनं दिलेल्या आदरातिथ्याची प्रशंसा केली.

**जम्मू-काश्मीर-चकमक**

जम्मू-काश्मीरमधील शोपियां जिल्ह्यात 'लष्कर-ए-तैयबाच्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलाच्या जवानांवर गोळीबार केल्यानंतर सुरक्षा दलांनी त्याला चोख प्रत्युत्तर दिले, ज्यामुळे दोन्ही बाजूंमध्ये चकमक सुरू झाली, असं लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. सात गावांचा समावेश असलेल्या 'मीमंदर' भागातल्या एका फळबागेत हे दोन दहशतवादी आढळून आल्यानंतर शुक्रवारी ही मोहीम हाती घेण्यात आली.

**फिफा**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत आज कॅनडावर 3-0 असा दणदणीत विजय मिळवत मोरोक्कोने उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. गतविजेत्या अर्जेंटिनानेही 'राउंड ऑफ 32' मधील एका सामन्यात 'कॅबो वर्दे'चा 3-2 असा पराभव करून 'राउंड ऑफ 16' मध्ये प्रवेश केला. कॅन्सस सिटी स्टेडियमवर काल खेळल्या गेलेल्या 'राउंड ऑफ 32' च्या अंतिम सामन्यात, कोलंबियाने घानाचा 1-0 असा निसटता पराभव करत 'राउंड ऑफ 16' मध्ये स्थान निश्चित केलं.

**महिलाटी-20विश्वचषक**

आयसीसी महिला टी-20 विश्वचषक अंतिम क्रिकेट सामना आज इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर खेळला जाणार आहे. उपांत्य फेरीत वेस्ट इंडीजचा पराभव करून ऑस्ट्रेलियानं अंतिम फेरीत स्थान निश्चित केले, तर गुरुवारी दक्षिण आफ्रिकेवर विजय मिळवून इंग्लंडने सलग सहावा विजय नोंदवला आणि विजेतेपदाच्या लढतीत आपले स्थान पक्के केले.

**पुरुष-T20-क्रिकेट**

पुरुष क्रिकेटमध्ये, मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड इथं झालेल्या पाच सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यात इंग्लंडनं भारताचा 4 गडी राखून पराभव केला.

भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित 20 षटकांत 7 गडी गमावून 190 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल इंग्लंडनं 19 षटकांत 6 गडी गमावून 191 धावा केल्या. जेकब बेथेलला 'सामनावीर' घोषित करण्यात आलं.
तत्पूर्वी, वैभव सूर्यवंशी भारतासाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला. 15 वर्षे आणि 99 दिवस वयाच्या वैभवनं भारतीय संघात पदार्पण केलं; या कामगिरीसह त्यानं सचिन तेंडुलकरचा दीर्घकाळ असलेला विक्रम मोडला. सचिननं 16 वर्षे आणि 205 दिवस वय असताना भारतासाठी पदार्पण केलं होते.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रासह आज गुजरात, गोवा आणि ओडिशामध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा, इशारा दिला आहे. छत्तीसगड, पूर्व मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान, कर्नाटक, तेलंगणा आणि विदर्भातही मुसळधार ते अति

मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. याशिवाय आसाम, मेघालय, किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश, केरळ आणि माहे इथं मुसळधार पावसाची शक्यता आहे. नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, उत्तराखंड आणि पश्चिम राजस्थानमध्येही आज मुसळधार पावसाचा अंदाज आहे. दिल्लीमध्ये आज हलक्या पाऊस आणि मेघगर्जनेसह सोसाट्याच्या वाऱ्यांची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**मुख्यमंत्री-पाऊस**

महाराष्ट्रात मुंबई महानगर क्षेत्रासह ठाणे, रायगड, पालघर तसंच नाशिक आणि पुण्याच्या काही भागात मुसळधार पाऊस आहे. उद्यापर्यंत या भागात सातत्यानं मुसळधार पावसाचा अंदाज असून अनेक भागात शाळाही बंद ठेवल्या असून एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि आपत्ती व्यवस्थापन कक्ष परिस्थितीवर नजर ठेवून आहेत.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.